199

International Wetland Day
02/02/2023



# विवेकानंद महाविद्यालयात जागतिक पाणथळ भूमी दिन साजरा

कोल्हापूर विवेकानंद कॉलेजच्या वनस्पतीशास्त्र विभागातील बी.एस्सी.भाग १, २ व ३ च्या विद्यार्थ्यांनी जागतिक पाणथळ भूमी दिन साजरा केला. दरवर्षी २ फेब्रुवारी हा दिन जागतिक पाणथळ दिन म्हणून साजरा केला जातो.

अनेक ठिकाणी उथळ पाण्याने झाकलेल्या व विविध प्रकारच्या गवतांनी आणि झुडूपांनी भरलेल्या जमिनी आपणास आढळतात. त्यांनाच पाणथळ भूमी असे म्हणतात. यामध्ये मुख्यत: नदी, तलाव, सागरी किनारे ही नैसर्गिक ठिकाणे तसेच कृत्रिम तलाव, कालवे, मिठागरे, शेततळी, भाताची खाचरे अशा स्थळांचाही समावेश होतो.

जैविक वैविध्याला जीवंत ठेवण्यात आणि ते वाढविण्यात पाणथळांची भूमिका अत्यंत मोलाची असते. त्यामुळे या ठिकाणांचे संरक्षण आणि संवर्धन करणे या उद्देशाने हा दिवस साजरा केला जातो.

यावेळी वनस्पतीशास्त्र विभागातील शिक्षक व विद्यार्थ्यांनी रंकाळा तलाव येथे पर्यावरणपूरक काम केले. तेथील प्लॅस्टिक कचरा, पाण्याच्या बाटल्या, तण काढून तेथील परिसर स्वच्छता केली, त्याचबरोबर प्रभातफेरी काढून समाजाला या विषयी माहिती दिली. याप्रसंगी श्रुती थोरात व प्राची मस्कर या विद्यार्थिनींनी आपल्या मनोगतात पानथळ भूमीचे महत्व समजावून सांगितले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे नियोजन विभागप्रमुख डॉ. बी. टी. दांगट यांनी केले. या कार्यक्रमासाठी प्राध्यापक, विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

Global Times (Newspaper)

VIVEKANAND COLLEGE ESTD. JUNE 1964 KOLHAPUR-416003